महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: 0253- 2539100/300, Ph.2539214/212/250/118/6659214/212/250/118
Email: preexam@muhs.ac.in coe@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

डॉ.अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations

जा.क्र. :मआविवि/एक्सपी/०८/४५६५/२०२१ दि. २४/०६/२०२१

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परीसंस्था
मआविवि, नाशिक

विषय : **विद्यापीठाच्या दि. १०/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ दरम्यानच्या परीक्षेस प्रविष्ठ न होवू शकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विशेष परीक्षेबाबत..**

संदर्भ : १. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र.(स्टॅम्प)६४६६/२०२१ मध्ये दि. ०५/०६/२०२१ रोजी दिलेला आदेश
२. मा. परीक्षा मंडळाच्या दि.०८/०६/२०२१ रोजीचा ठराव
३. विद्यापीठ परीपत्रक क्र. २५/२०२१ दि. १९/०६/२०२१
४. विद्यापीठ परीपत्रक क्र. २६/२०२१ दि. १९/०६/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ परीक्षा : **UG Ist, IInd, IIIrd Year Courses-**(MBBS,BDS,BAMS,BUMS,BHMS,Basic B.Sc, PBBSc, BPTh, BOTh, BASLP,BPO) व **University Courses** – (BPMT, M.Sc.Pharmaceutical, MPH(N), MBA, B.Optometry, Dip. Optometry / Ophthalmic, Dip. Paramedical, PG-DMLT, CCMP ) या दि. १०/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ या कालावधीत संचलित होत आहेत.

विद्यापीठाने सर्व महाविद्यालय/परीसंस्था यांना विद्यापीठ परीपत्रक क्र. १९/२०२१ दि. ०५/०६/२०२१ नुसार मा. न्यायालयाच्या उक्त आदेशाचे पालन करणेबाबत कळविलेले आहे. मा. न्यायालयाच्या दि. ०५/०६/२०२१ च्या आदेशानुसार, दि. १०/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ दरम्यान आयोजित लेखी परीक्षा देवू न शकलेल्या विद्यार्थ्यांची, शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून एक वेळेची विशेष बाब म्हणून ***त्यांनी न दिलेल्या विषयांचीच फक्त पुनःश्च विशेष परीक्षा*** आयोजित करण्यात येईल असे संदर्भांकित विद्यापीठ परीपत्रक क्र. ३ व ४ अन्वये कळविलेले आहे.

सदर परीक्षा दि. ३० जुलै,२०२१ पासून नियोजित करण्यात येत असून सोबत विषयनिहाय अंतिम वेळापत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच कोव्हिड-१९ कारणामुळे अथवा इतर कारणामुळे लेखी परीक्षेस अनुपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची, विशेष लेखी परीक्षा घेणेबाबतची मानक कार्यप्रणाली (S.O.P.) परीपत्रक क्र. २५/२०२१ व २६/२०२१ अन्वये निर्गमित करण्यात आलेली आहे. कोव्हिड-१९ अहवाल सकारात्मक (Positive) आल्यामुळे हिवाळी-२०२० प्रात्यक्षिक परीक्षेस बसू न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी सूचनात्मक मानक कार्यप्रणाली परीपत्रक क्र. ०८/२०२१ दि. ०४/०३/२०२१ अन्वये (S.O.P.) प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर विशेष परीक्षेसाठी महाविद्यालयनिहाय परीक्षाकेंद्राची यादी दि. ३०/०६/२०२१ रोजी खालील लिंकवर जाहिर करण्यात येईल व त्याप्रमाणे परीक्षासंचलनाची पुढील कार्यवाही करण्यात येईल. सदर विशेष परीक्षा विहित मुदतीत संचलीत करुन लवकरात लवकर निकाल घोषित करणे हे पुढील उन्हाळी/हिवाळी परीक्षेच्या संचलनासाठी आवश्यक असल्याकारणाने पात्र विद्यार्थ्यांनी सदर वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या केंद्रावरच परीक्षा देणे बंधनकारक असेल याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे नोंद घ्यावी.

(डॉ. अ. ग. पाठक)
परीक्षा नियंत्रक

सोबतः (१) विशेष परीक्षा वेळापत्रक दि. (३०/०७/२०२१ ते १७/०८/२०२१) (Click Here)
(२) विशेष परीक्षा :एकूण ८६ परीक्षाकेद्रांची यादी (**Click Here from 30/06/2021**)
(३) संदर्भीय क्र.३ व ४ चे विद्यापीठ परीपत्रक क्र.२५/२०२१(Click Here)व क्र.२६/२०२१(Click Here)